## रिटेल फायनान्स :-

### ३) घर बांधणी, घर फ्लॅट / रो हाऊस खरेदी

**(१) पगारदार नोकरांच्या साठी :-**

**कर्ज मर्यादा -** एकूण पगाराच्या ६० पट किंवा इस्टीमेटच्या ८० % परंतू परतफेड विचारांत घेऊन जास्तीत जास्त रु.२५.०० लाख.

**मुदत** - १५ वर्षे (मासिक-हप्ता)

**व्याजदर** - १२.५०% (ज्या त्या वेळच्या धोरणानुसार व्याजदर राहील)

**कर्जदार पात्रता -**

१) अर्जदार हा सांगली जिल्हयातील रहिवाशी असणे आवश्यक.

२) अर्जदार यांचा मासिक पगार वितरणासाठी बँकेत/शाखेत जमा होणे आवश्यक राहील.

३) अर्जदार व जामिनदार बँकेचा ब वर्ग सभासद असणे आवश्यक.

४) अर्जदार हा शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था,जि.प.शाळा, माध्यमिक, उच्च माध्यमिक,महाविद्यालयीन (संस्थेत) कायमस्वरुपी नोकर असला पाहिजे. त्याची किमान ३ वर्षे कायम सेवा झाली पाहिजे व उर्वरित सेवा कमीत कमी ५ वर्षे असणे आवश्यक.

५) अर्जदार यांचे पगारातून संभाव्य घर कर्जाचा हप्ता व इतर सर्व प्रकारच्या कपाती वजा जाता एकूण पगाराचे २५% इतकी रक्कम रोख शिल्लक राहीली पाहिजे.

६) दोन जामिनदारांचा पगाराचा दाखला.

७) सक्षम अधिकाऱ्याकडून (अपॉईटींग ॲथोरिटी) अर्जदाराचा सेवा कालावधी, जन्मतारीख, पगार, वर्तणूकीचा व पगारातून संभाव्य घर कर्जाचा हप्ता कपात करुन देणेबाबत अथवा बदली झालेस तसे त्या कार्यालयांस कळविणेबाबतचा विहीत नमुन्यात) दाखला.

८) अर्जदाराचे बँकेमध्ये किमान ६ महिन्यापेक्षा जादा कालावधीचे बचत ठेव (सेव्हिंग्ज) खाते असले पाहिजे.

**तारण -**

१) कर्जातून घेतलेला फ्लॅट/घर/बंगला/रो-हाऊस/दुकान गाळा खरेदीवेळी तसेच घर बांधकाम करणार असलेल्या जागेसह त्यावर तयार होणा-या घरावर कर्ज मंजूरीनतर मॉर्गेज डीडने बोजा नोंद करुन देणे आवश्यक राहील.

२) कर्ज मंजूर मर्यादेमधून ५% रक्कम ठेवीमध्ये गुंतवणूक करणेची असून सदरची ठेव कर्जास सहतारण राहील.

**घरबांधकाम कागदपत्रे -**

१) जागेच्या मालकी हक्काबाबत निर्वेध मालमत्ता कार्डाचा उतारा/सिटी सर्व्हे उतारा/७/१२उतारा.
२) मिळकत उताऱ्याचा १३ वर्षाचा वकिलांचा सर्च रिपोर्ट.
३) ग्रामपंचायत/नगरपालिका /महानगरपालिका बांधकाम परवाना व मंजूर नकाशाची प्रत.
४) बांधकाम प्लॅन व एस्टीमेट.
५) जमिनीवर कोणताही बोजा नसलेबाबतचा दाखला.

**घर/फ्लॅट/रो- हाऊस/गाळा खरेदी कागदपत्रे -**

१) खरेदी करणार असणा-या निर्वेध मिळकतीचा उतारा
२) सदर मिळकत उताऱ्याचा १३ वर्षाचा सर्च रिपोर्ट(बँक पॅनेलवरील)
३) खरेदी करणा-या मिळकतीचे मान्यताप्राप्त व्हॅल्यूअर यांचा मुल्यांकन दाखला(बँक पॅनेलवरील)
४) खरेदी व्यवहाराचे नोटराईज्ड करारपत्र.